# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**


एम. आय. डी. सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./६०९८ /२०२१ दि. २८/०६/२०२१

## परिपत्रक

**विषय:- कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत -**
**(Level of Restrictios for SAFE MAHARASHTRA).**

**संदर्भ**:- १) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे कार्यालयीन आदेश क्र. जिका/क्र.कार्या-३/अका. आव्यक/कावि- ९७०/२०२१, दि. १८/०६/२०२१.

२) विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र. गो.वि./आस्था./५९३०/२०२१, दि. २१/०६/२०२१

३) Government of Maharashtra Department of Revenue and Forest Disaster Management Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai order No. DMU/2020/ CR. 92/Dis M-1, Dated 25th June 2021.

४) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे कार्यालयीन आदेश क्र. जिका/क्र.कार्या-३/अका. आव्यक/कावि- ९९५/२०२१, दि. २७/०६/२०२१.

५) जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालयीन आदेश क्र. एमजी/कार्या-८/टे.३/सांले/२०२१/६६१ दि. २५/०६/२०२१

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य तसेच गोंडवाना विद्यापीठातील शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख यांना याव्दारे सुचित करण्यात येते की, कोरोना विषाणूचा(कोव्हीड-१९) वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली तसेच जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचेव्दारे वेळोवेळी मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्याबाबत आदेश निर्गमीत करण्यात केलेले आहेत.

संदर्भीय आदेशान्वये कोविड-१९ साथरोगसंदर्भाने सुरक्षित महाराष्ट्र अंतर्गत शासनाने नविन नियमावली जाहिर केलेली आहे. त्याअनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित गडचिरोली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य तसेच गोंडवाना विद्यापीठातील शैक्षणिक विभांगाचे सर्व विभाग प्रमुख यांनी सदंर्भ क्र. ४ च्या आदेशान्वये तसेच चंद्रपूर जिल्हयातील सर्व महाविद्यालयांनी संदर्भ क्र. ५ च्या आदेशान्वये कार्यवाही घेवून, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठ प्रशासनास सादर करावा.

**संलग्न**:- संदर्भ क्र. ३, ४ व ५ चे आदेश.

२८/६/२०२१
(डॉ. अनिल चिताडे)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव सविनय सादरः-**

१) मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४) मा. विभाग प्रमुख, सर्व विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५) सिस्टीम डाटाबेस ॲडमिनीस्ट्रेटर, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचना करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
६) उपकुलसचिव, आस्थापना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(डॉ. विजय सिलारे) २८-६-२०२१
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

GOVERNMENT OF MAHARASHTRA
**Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 400 032**
**No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 25th June , 2021**

ORDER

**Levels of Restrictions for SAFE MAHARASHTRA**

---

**Reference:**

1.The Epidemic Diseases Act, 1897.
2. The Disaster Management Act, 2005
3. Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation Department Order **No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 4th June , 2021**

Whereas, in exercise of the powers, conferred under the Disaster Management Act 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee has vide various orders imposed restrictions in the State to break the chain of transmission of the COVID 19 virus from time to time;

And whereas the State Government is satisfied that the State of Maharashtra continues to be threatened with the spread of COVID-19 virus;

And whereas post above referred order dated 4th June, 2021, new variants like *delta, delta plus* etc. have come to spread and are fuelling the potentiality of imminent (4-6 weeks), more severe third wave with wider geographical area;

And whereas INSACOG (a consortium of laboratories for Whole Genome Sequencing in the context of Covid 19 pandemic) has intimated that Delta Plus Variant is currently a Variant of Concern (VOC) with following characteristics:

1. Increased transmissibility
2. Stronger binding to receptors of lung cells
3. Potential reductions in monoclonal antibody response;

And whereas this VOC has been found in Maharashtra - in Ratnagiri, Jalgaon and other districts - requiring stricter restrictions in general to contain the spread of this virus;

And whereas these mutations to the virus and its continual evolution mean that unforeseen situations may unfold requiring wider and stricter restrictions, though current indices taken into account for imposing administrative level restrictions may indicate so and thus state level triggers other than Oxygen Beds Occupancy at state level need to be promulgated;

And whereas feedback and experience with not so satisfactory CAB compliance by public at large as well as deliberations of Task Force created for recommendation on Covid Treatment Protocols require revising the said order;

Now therefore, in exercise of the powers conferred under provisions of The Disaster Management Act, 2005, following modifications/ alternations and additions to the above referred order dated 4th June, 2021 are hereby promulgated for compliance by all.

1. **State Level Triggers:** Given that the virus causing Covid 19 is undergoing mutations in various geographies and that these mutations are displaying more transmissibility and potential reductions in monoclonal antibody response, a State Level Trigger mandating all the administrative units, irrespective of values of the indices of weekly positivity rate and oxygen bed occupancy percentage to remain at a level not below 3 is to be in operation till withdrawn by specific order of SDMA.

2. **Weekly Positivity Rate:** Weekly positivity rate to be considered for decision regarding levels of restrictions to be applied must be determined only on the basis of RT-PCR tests and not RAT or other tests. Data for this shall be made available by Public Health Department.

3. **Declaration Process for Levels of Restrictions to be followed by DDMA:** DDMA shall take data from Public Health Department and shall decide the level of restrictions that maybe followed in various administrative units under their jurisdiction subject to any State Level Trigger in operation. Above referred order of 4th June, 2021 gives the base level, subject to State Level Triggers, that they must adhere to as a minimum. However, as mentioned in the section VI of the above referred order of 4th June, 2021 DDMA may decide to impose higher level of restrictions or further restrictions with the same base level of restrictions. DDMA shall not require prior permission of SDMA for going for higher level of restrictions or putting extra restrictions.

4. While coming down onto a lower level, DDMA shall look into two weeks' trend before accepting lower level of restrictions. When there is an upward trend in number of positive cases being identified daily and requiring a higher level of restrictions than the current one, DDMA however shall do so without waiting for two weeks' trends.

5. DDMA shall take following special actions in addition to ensure ease of restrictions do not lead to spread of Covid 19:

    1. Push vaccination through public awareness activities; Attempt must be to achieve vaccination of 70% of eligible population at the earliest; encourage work place vaccinations especially of blue collar workers;

    2. Push Test-Track-Treat methodology to contain the spread,

3. Enforce on establishments to ensure safe work spaces with proper air ventilation norms using neither hepa filters or proper exhaust fans due to airborne droplet nature of the virus,

4. Carry out large number of tests and percentage of RT-PCR tests vis-a-vis other tests must be as expected by Public Health Department,

5. Impose fines effectively on violators of Covid Appropriate Behaviour,

6. Avoid events/ functions/ activities that lead to crowding, congregations and gatherings,

7. Declare containment zones judiciously so that restrictions are imposed on a smaller area, especially defaulting area,

8. Make flying squads for enforcement of CAB, especially to check high incidence events like marriages and establishments like restaurants, malls etc. It must be appreciated that CAB compliance is a must for lowering restrictions that are nothing but social level desperate measures in case of failure of this compliance by individual citizens.

BY ORDER AND IN THE NAME OF THE GOVERNOR OF MAHARASHTRA

(Sitaram Kunte)
Chief Secretary

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 10301 दि. 28/6/2021
जावक क्र.............दि............

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 5434 दि. 28/06/21
जावक क्र. ...... दि. ......

# महाराष्ट्र शासन
## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली

**तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली-४४२६०५**
▸ टोल फ्री क्रमांक :१०७७ ▸ हॉटलाईन क्र.: २००७ ▸ दूरध्वनी क्र.: ०७१३२-२२२०३०/३१/३५,
▸ मोबाईल क्र.: ९४२३९११०७७ ▸ E-mail id :dmcellgadchiroli@gmail.com

सत्यमेव जयते

**जि.का./क्र.कार्या-३/अका.आव्यक/कावि-९९५/२०२१** **दिनांक :- २७ जुन, २०२१**

सुधारित

**संदर्भ:**

**१) साथरोग अधिनियम, १८९७.**
**२)आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.**
**३) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई, अधिसुचना दि.१४.०३.२०२०**
**४) भारत सरकार, गृह विभाग, यांचे आदेश क्र. ४०-३/२०२०-DM-१(A), दिनांक २४.०३.२०२०**
**५) महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्रमांक. डीएमयु-२०२०/ सी.आर.९२/ डीएमयु-१,** दिनांक २ मे, २०२०, ३ मे, २०२०, ५ मे, २०२०, ११ मे, २०२०, १५ मे, २०२०, १७ मे, २०२०, १९ मे, २०२०, २१ मे, २०२०, ३१ मे, २०२०, ४ जून, २०२०, २५ जून, २०२०, २९ जून, २०२०, ६ जुलै, २०२०, ७ जुलै, २०२०, २९ जुलै,२०२०, ४ ऑगस्ट,२०२०, १९ ऑगस्ट,२०२०, ३१ ऑगस्ट, २०२०, ३० सप्टेंबर, २०२० व १४ ऑक्टोबर, २०२०, २३ ऑक्टोबर, २०२०, २९ ऑक्टोबर, २०२०, ३ नोव्हेंबर, २०२०, १४ नोव्हेंबर, २०२०, २३ नोव्हेंबर, २०२०, २७ नोव्हेंबर, २०२०, २७ नोव्हेंबर, २०२०, २१ डिसेंबर, २०२०, २४ डिसेंबर, २०२०, २९ डिसेंबर, २०२०, १४ जानेवारी, २०२१, १९ जानेवारी, २०२१, २९ जानेवारी, २०२१, २४ फेब्रुवारी, २०२१, १५ मार्च, २०२१ आणि २७ मार्च, २०२१, ०४ एप्रिल २०२१, ०५ एप्रिल, २०२१, १३ एप्रिल, २०२१, १४ एप्रिल २०२१, १६ एप्रिल २०२१. १९ एप्रिल, २०१४, २० एप्रिल, २०२१, २१ एप्रिल, २०२१, २९ एप्रिल, २०२१, १२ मे, २०२१, ३० मे, २०२१, **०४ जुन, २०२१**, १० जुन २०२१, १७ जुन २०२१, **२५ जुन २०२१**
**६) गृहमंत्रालय (एमएचए) आदेश क्रमांक.४०-३ / २०२०-पीएम-१(ए), दिनांक** १ मे, २०२०, ११ मे, २०२०, १७ मे, २०२०, २० मे २०२०, ३० मे२०२०, २९ जून, २०२०, २९ जुलै, २०२०, २९ ऑगस्ट, २०२०, ३० सप्टेंबर, २०२० व २७ ऑक्टोबर, २०२०, २५ नोव्हेंबर, २०२०, २८ डिसेंबर, २०२०, २७ जानेवारी, २०२१ आणि २३ फेब्रुवारी, २०२१, २८ मे, २०२१

**७) या कार्यालयाचे आदेश दिनांक** ११.०३.२०२०, १६.०३.२०२०, २०.०३.२०२०, २२.०३.२०२०, २३.०३.२०२०, २६.०३.२०२०, ०३.०४.२०२०, १३.०४.२०२०, १७.०४.२०२०, १९.०४.२०२०, २४.०४.२०२०, ०३.०५.२०२०, ०८.०५.२०२०, १८.०५.२०२०, ३१.०५.२०२०, २५.०६.२०२०, २६.०६.२०२०, २७.०६.२०२०, २९.०६.२०२०,०६.०७.२०२०, ३०.०७.२०२०, ३०.०९.२०२०, १४.१०.२०२०, २४.१०.२०, ३१.१०.२०, ०४.११.२०२०, १६.११.२०२०, १७.११.२०२०, २४.११.२०२०, २५.११.२०२०, ३०.११.२०२०, २२.१२.२०२०, १८.१२.२०२१, ३१.१२.२०२०, २९.०१.२०२१, २६.०२.२०२१, २.०३.२०२१, ०९.०३.२०२१, १६.०३.२०२१, ३०.०३.२०२१, ०४.०५.२१, ०५.०४.२१, ०६.०४.२१, ०७.०४.२१, १२.०४.२१, १४.०४.२०२१, १९.०४.२०२१, २०.०४.२०२१, २२.०४.२०२१, २९.०४.२०२१, ०५.०५.२०२१, १४.०५.२०२१, ३१.०५.२०२१, **०५.०६.२०२१, ११.०६.२०२१, १८.०६.२०२१**

# आदेश
### (कोविड-१९ साथरोगसंदर्भाने सुरक्षित महाराष्ट्र अंतर्गत नियमावली)

**ज्याअर्थी,** संदर्भिय अधिसूचना क्रमांक ३ अन्वये महाराष्ट्र राज्यात दिनांक १३.०३.२०२० पासून साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. या अधिनियमाअंतर्गत खंड २,३ व ४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार कोरोना विषाणू (कोविड-१९) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्यास प्रतिबंध करणे याकरिता या कार्यालयाचे संदर्भिय ७ नुसार विविध आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत व सद्यस्थितीत सदर आदेशाच्या तरतूदी गडचिरोली जिल्ह्यात लागू आहेत.

**ज्याअर्थी,** उक्त संदर्भ क्रमांक ०५ चे शासन आदेशान्वये, महाराष्ट्र राज्यात कोविड-१९ साथरोगसंदर्भाने उचित प्रतिबंधात्मक उपाययोजनानंतर्गत नियमावली व उपाययोजना जिल्ह्यात लागू आहेत.

DR (Estt) 28/6/2021

Dr. Deshmukh (AR) कार्यवाही घ्यावी. 28.6.2021

**ज्याअर्थी**, उक्त संदर्भ क्र. ५ चे दिनांक २५.०६.२०२१ चे शासन आदेशातील तरतुदीच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्हयातील नागरी, ग्रामीण तसेच औद्योगिक क्षेत्रातील जनतेस, खालील व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशुन या कार्यालयाचे संदर्भ क्र.०७ वर नमुद यापूर्वी लागू असेलेले लॉकडाऊन संदर्भात सुधारित आदेश काढणे आवश्यक असल्याचे माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी, मी दीपक सिंगला, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली** वरील संदर्भ क्र. ५ मधील दिनांक २५.०६.२०२१ चे शासन निर्देशाप्रमाणे कोविड - १९ साथरोग संदर्भाने **"निर्धारित प्रतिबंधात्मक पातळी"** अंतर्गत किमान पातळी ही पातळी-३ (Level-3) निश्चित करण्यात आले आहे सबब मोडत असून वरील संदर्भ क्र. ५ मधील दिनांक ०४.०६.२०२१ व २५.०६.२०२१ चे शासन निर्देशाप्रमाणे तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ उक्त आदेशानुसार वेळोवेळी सुरु केलेले व प्रतिबंधित बाबींना जिल्हा गडचिरोली सीमा क्षेत्रात जमावबंदी व टाळेबंदीसंदर्भात नियमावली आणि उपाययोजना कालावधी **२८ जुन, २०२१ चे सकाळी ०७.०० वाजेपासून पुढील आदेशापर्यंत लागू करीत आहे.**

*शासन व जिल्हा प्रशासनाचे निर्देशाप्रमाणे वेळोवेळी निर्गमित केलेले आदेशातील सर्व निर्देश, सूचना, अटी व शर्तीचे पालन करणे सर्व संबंधितांना बंधनकारक असेल.* **उक्त संदर्भ क्र. ५ मधील ०४.०६.२०२१ व २५.०६.२०२१ शासन आदेशातील अटी, शर्ती, दंडाबाबत निर्देशाचे काटेकोर पालन करणे सर्व संबंधित व्यक्ती, आस्थापना व शासकीय-निमशासकीय विभागांना बंधनकारक असून खालील अतिरिक्त अटी व शर्तीचे पालन करणे सक्तीचे असेल.**

| अ. क्र. | बाबी | पातळी 3 (Level-3) अंतर्गत अनुज्ञेय बाबी/निर्देश |
|---|---|---|
| १ | **अत्यावश्यक सेवेत मोडणारी दुकाने** | अत्यावश्यक सेवेत मोडणाऱ्या दुकानांना सोमवार ते रविवार चे सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. |
| २ | **अत्यावश्यक सेवा वगळून इतर दुकाने** | सदर दुकाने सोमवार ते शुक्रवार चे सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. |
| ३ | **मॉल, सिनेमागृह/नाट्यगृह** | पुढील आदेशापर्यंत **बंद** असतील. |
| ४ | **रेस्टॉरेन्ट, उपहारगृह** | सोमवार ते शुक्रवार चे सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत ५०% डायनिंग क्षमतेसह **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. तथापि इतर वेळेस पार्सल/होम डिलीव्हरी सुरु ठेवता येईलृ |
| ५ | **सार्वजनिक स्थळे, खुले मैदान इ.** | सार्वजनिक स्थळे, खुले प्रेक्षागृह, मॉर्निंग वॉक, सायकलिंग हे सर्वदिवस सकाळी ५ ते ९ वाजेपर्यंत **सुरु** असेल. परंतु गार्डन/पार्क **बंद** असतील. |
| ६ | **खाजगी कार्यालय** | सोमवार ते शुक्रवार चे सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. |
| ७ | **खाजगी/शासकीय कार्यालयातील उपस्थिती** | **५०%** उपस्थितीसह **सुरु** ठेवता येईल. याहून अधिक उपस्थिती गरजेचे असेल तर संबंधित विभागप्रमुखाने जिल्हाधिकारी गडचिरोली यांची पूर्वपरवानगी घ्यावी. |
| ८ | **क्रीडा** | सोमवार ते शुक्रवार चे सकाळी ५ ते ९ वाजेपर्यंत तर सायंकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत आऊटडोअर क्रीडाविषयक बाबी सुरू ठेवण्याची मुभा असेल. |
| ९ | **सामाजिक/सांस्कृतिक/मनोरंजन इ. ठिकाणची गर्दीबाबत** | सोमवार ते शुक्रवार चे सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत कोविड-१९ निर्देशाचे अधिन राहून सामाजिक सभागृहात/हॉल च्या ५०% क्षमतेच्या आत परंतु उपस्थितांची **कमाल मर्यादा ही ५० लोकांची असेल.** |
| १० | **विवाह कार्यक्रम** | कोविड-१९ निर्देशाचे अधिन राहून सामाजिक अंतर राखून **एकूण ५० लोकांच्या मर्यादेत** कार्यक्रम पार पाडण्याची मुभा असेल. तथापि याचे उल्लंघन केल्यास रु. ५००००/- दंड व संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ११ | **अंत्यविधी** | कोविड-१९ निर्देशाचे अधिन राहून **एकूण २० लोकांच्या मर्यादेत** कार्यक्रम पार पाडण्याची मुभा असेल. |
| १२ | **स्था.स्व.संस्था व सहकारी संस्था यांचे बैठका व निवडणुकाबाबत** | कोविड-१९ निर्देशाचे अधिन राहून सामाजिक अंतर राखून **५० लोकांच्या मर्यादेत** सुरू ठेवण्याची मुभा असेल. |
| १३ | **बांधकाम** | सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत प्रत्यक्ष बांधकामस्थळावर कामास **मुभा** असेल परंतु कामगारांना दुपारी ४ वाजेनंतर काम करण्याची परवानगी नसेल. |
| १४ | **कृषी विषयक सेवा, दुकाने** | सोमवार ते रविवार चे सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत कोविड-१९ निर्देशाचे अधिन राहून **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. |
| १५ | **ई-कॉमर्स 'साहित्य व सेवा'** | नियमितपणे सुरु असतील. |
| १६ | **जमावबंदी/संचारबंदी** | **जमावबंदी :** सकाळी ६.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत एकत्रितरित्या ५ हून अधिक लोकांना एकत्र जमण्यास मज्जाव असेल.<br>**संचारबंदी :** सायंकाळी ५.०० ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत वैध कारणाशिवाय बाहेर फिरण्यास मनाई असेल. |
| १७ | **व्यायामशाळा, सलून, ब्युटीपार्लर, स्पा, वेलनेस सेंटर्स इ.** | सोमवार ते शुक्रवार चे सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत कोविड-१९ निर्देशाचे अधिन राहून **५० टक्के क्षमतेसह सुरू** ठेवण्याची मुभा असेल तथापि सदर ठिकाणांमध्ये एसी चा वापर करता येणार नाही. |
| १८ | **सार्वजनिक वाहतूक व्यवस्था** | **१०० टक्के क्षमतेसह सुरु** ठेवता येणार तथापि सदर वाहनांमध्ये आसनव्यवस्थेव्यतिरिक्त उभ्याने प्रवासी नेण्यास मनाई असेल. |
| १९ | **कार्गो सेवा-वाहतूक** | नियमितपणे सुरु असतील. |
| २० | **आंतरजिल्हा वाहतूकसंदर्भात ई-पास बाबत** | नियमितपणे सुरु असतील. तथापि दिनांक ०४.०६.२०२१ चे शासन आदेशानुसार निर्धारित पातळी-५ (Level-5) मधील जिल्ह्यात आवागमन करिता अतितातडीच्या कारणाकरिता ई-पास आवश्यक असेल.<br>तसेच **आंतरराज्य वाहतुकीसंदर्भात** शासनातर्फे वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे सर्व संबंधितांना बंधनकारक असेल. |
| २१ | **उत्पादनसेवा-MSME** | नियमितपणे सुरु असतील. |
| २२ | **उत्पादन सेवा**<br>१. अत्यावशक सेवासंबंधी<br>२. प्रोसेसिंग सेवासंबंधी<br>३. राष्ट्रीय सुरक्षेसंबंधी<br>४. डाटा सेंटर्स/क्लाऊड सर्विस प्रोवायडर/क्रिटीकल इन्फ्रास्ट्रक्चर आणि सेवासंबंधी आयटी क्षेत्र | नियमितपणे सुरु असतील. |
| २३ | **उत्पादन सेवा** (वरील मुददा क्र. २३ व २४ वगळून इतर सर्व प्रकारचे वैध) | नियमितपणे सुरु असतील तथापि ५०% कर्मचाऱ्यांचे वाहूतकीस मुभा असेल. |
| २४ | **शाळा/महाविद्यालये/कोचिंग क्लासेस** | पुढील आदेशापर्यंत **बंद** असतील तथापि, शिक्षण विभाग, उच्च तंत्रशिक्षण विभाग यांचे निर्देशानुसार वेळोवेळी आवश्यक अंमलबजावणी करण्यात यावे. |
| २५ | **आठवडी बाजार** | पुढील आदेशापर्यंत **बंद** असतील. |

१. वरील विवरणपत्रातील ज्या-ज्या बाबींना दुपारी ४ पर्यंत सुरु ठेवण्याची मुभा असेल त्या ठिकाणांमधील व्यक्तींना-कामगारांना सायं. ५ पर्यंत स्वत:च्या घरी पोहाचणे गरजेचे असेल.

२. कोविड-१९ साथरोगसंदर्भाने कार्यरत कार्यालये, आरोग्य विभाग इ. १०० टक्के कार्यक्षमतेने कार्यरत राहील.

३. **अत्यावश्यक सेवांमध्ये पुढील सेवांचा समावेश होतो:-**

1. रुग्णालये, रोगनिदान केंद्रे, चिकित्सालये, वैद्यकीय विमा कार्यालये, औषध विक्रेते, औषध निर्माण कंपन्या, इतर उत्पादन व वितरणासह वैद्यकीय व आरोग्य सेवा तसेच त्यांचे डीलर्स, वाहतूक व वितरण साखळी. कोविड साथरोग संबंधी लस, सॅनिटायझर, मास्क, वैद्यकीय साहित्ये, कच्चे उत्पादने/सेवा इ.
2. व्हेटरीनरी हॉस्पीटल्स/ॲनिमल केअर सेंटर्स व पेट फुड शॉप्स
3. वनविभागाने घोषित केलेले वनीकरणासंदर्भातील कामे
4. ऍवियेशन आणि संबंधी सेवा (एअरलाईन, विमानतळे, देखभाल, कार्गो, इंधन, सुरक्षा इ.)
5. किराणा मालाची दुकाने, भाजीपाल्याची दुकाने, फळविक्रेते, दूधपुरवठा केंद्रे (दुग्धशाळा), बेकरी, मिठाईची दुकाने व इतर सर्व प्रकारची खाद्यान्नदुकाने. **(परंतु पानटपरी/पानठेले, तंबाखुजन्य व्यवसाय सुरु ठेवता येणार नाही.)**
6. कोल्ड्स स्टोरेज व वेअरहाऊसिंग संबंधित सेवा
7. सार्वजनिक परिवहन- रेल्वेगाड्या, टॅक्सी, ऑटोरिक्षा व सार्वजनिक बस.
8. विविध देशांच्या राजदूतांच्या कार्यालयांच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या सेवा.
9. स्थानिक प्राधिकरणांद्वारे केली जाणारी मान्सूनपूर्व (पावसाळापूर्व) कामे.
10. स्थानिक प्राधिकरणांद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सर्व सार्वजनिक सेवा.
11. भारतीय रिझर्व बँकेने विनियमित केलेल्या संस्था
12. टेलिकॉम सेवाशी संबंधित देखभाल/दुरुस्तीची कामे
13. मालवाहतूक.
14. पाणी पुरवठाशी संबंधित कामे
15. कृषी संबंधित सेवा व बी-बियाणे, खते, साहित्ये, दुरुस्ती इ. दुकाने
16. साहित्यांचे निर्यात-आयात
17. ई- वाणिज्य (केवळ अत्यावश्यक साहित्यांचे पुरवठासंदर्भात)
18. अधिस्वीकृत प्रसारमाध्यमे.
19. पेट्रोलपंपआणिपेट्रोलियमशीसंबंधितअसलेलीउत्पादने
20. सर्व कार्गो सेवा
21. विदाकेंद्रे (डेटासेंटर्स)/क्लाऊड सेवा पुरवठादार / निर्णायक स्वरूपाच्या (क्रिटिकल) पायाभूत सुविधा व सेवा यांना सहाय्यभूत असणाऱ्या माहिती तंत्रज्ञान सेवा.
22. शासकीय व खाजगी सुरक्षा सेवा.
23. इलेक्ट्रिक व इंधन गॅस पुरवठा
24. बँकांची एटीएम्स
25. पोस्टल सेवा

26. सीमाशुल्क गृह अभिकर्ते/लसी / जीवरक्षकऔषधे/ औषध निर्मितीशी संबंधित उत्पादने यांची वाहतूक करण्यामध्ये सहयोगी असलेले लायसन्सधारक बहुप्रतिमानवाहतूक कार्यचालक.
27. अत्यावश्यक सेवामध्ये मोडणाऱ्या बाबींकरिता पॅकेजिंग करणारी उत्पादने.
28. पावसाळ्यात आवश्यक असणात्या महत्त्वाच्या साधनसामुग्रीशी संबंधित उत्पादने.
29. आपले सरकार केंद्र/सीसीसी/सेतु केंद्र **(परंतु सदर ठिकाणी ५ पेक्षा अधिक लोक एकत्र येणार नाहीत याची दक्षता संबंधितांनी घेण्यात यावी.)**

४. **अतिरिक्त अपवादात्मक बाबी:-**

1. केंद्र, राज्य, स्थानिक प्राधिकरणाची कार्यालये
2. सार्वजनिक बँका, सार्वजनिक उपक्रम, सहकारी संस्था
3. अत्यावश्यक सेवासंबंधी कंपन्या
4. वीमा/मेडीक्लेम कंपनी
5. औषध उत्पादन/वितरणसंबंधी फार्मासिटयुकल कंपनी
6. आरबीआई तर्फे मान्यताप्राप्त सीसीआएल, एनपीसीआई, पेमेंट सिस्टीम इ.
7. नॉन बँकिंग फायनान्शियल कार्पोरेशन
8. सर्व सूक्ष्म वित्तपुरवठा संस्था
9. न्यायालये, लवादे, न्यायालयीन चौकशी कार्यालये

५. **संकीर्ण:-**

1. उक्त निर्देशांचे काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही संबंधित तालुक्यांचे **तहसिलदार** तथा इन्सिडंट कमांडटंट यांची असेल. त्यांनी संबंधित क्षेत्राचे मुख्याधिकारी-न.प./न.पं., पोलीस निरीक्षक यांचेसमवेत आवश्यक अंमलबजावणी करावी. तसेच गर्दीचे ठिकाणांवर, दुकानांमध्ये उक्त निर्देशांचे पालन होत आहे किंवा नाही याबाबत भरारी पथकांच्या माध्यमांतून उचित संनियंत्रण ठेवावे. जे व्यक्ती/आस्थापना/दुकाने कोविड-१९ साथरोगसंदर्भाने निर्देशांचे पालन करीत नसल्याचे निदशर्नास आल्यास त्यांचेवर रीतसर कारवाई करण्यात यावी.
2. संबंधित आदेशांचे योग्य अंमलबजावणी होत असल्याबाबत संनियंत्रयणाची जबाबदारी ही संबंधित क्षेत्राचे **उपविभागीय अधिकारी (राजस्व)** यांची असेल.
3. आरोग्य विभागाने कोविड-१९ लसीकरणासंदर्भाने व्यापक जनजागृती करावी व लवकरात लवकर ७०% **लसीकरण** पूर्ण करण्याच्या दृष्टीने काटेकोर नियोजन करावे व आवश्यक उपाययोजना पूर्ण करावे तसेच कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी टेस्ट-ट्रेक-ट्रीट या त्रिसुत्रीचा व्यापक प्रमाणात वापर करावा.
4. सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी व विभागांनी **आरटीपीसीआर** तपासणींची संख्या वाढवावी.
5. महसूल/पोलीस/स्थानिक स्वराज्य संस्था यांनी कोविड-१९ साथरोगसंदर्भाने प्रशासनाने दिलेल्या निर्देशांचे पालन न करणाऱ्यांवर प्रभावीपणे दंडात्मक कारवाई करावी.
6. सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यावश्यक साधने व सुविधा यांची साठेबाजी व काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध नियमाप्रमाणे कठोर कारवाई करावी.

सदरील आदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच भारतीय दंड संहिता १८६० नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचे आदेश आज दिनांक २७/०६/२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत असून सदर आदेश गडचिरोली जिल्हा सीमा क्षेत्रात दिनांक २८/०६/२०२१ चे सकाळी ७ ते पुढील आदेशापर्यंत लागू असेल.

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली

**प्रतिलिपी- माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा. मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
३) मा. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.**

४) पोलीस अधिक्षक, गडचिरोली.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली
६) समादेशक, रारापोब क्र.१३, विसोरा, ता. देसाईगंज, जिल्हा गडचिरोली
७) अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली/अहेरी
८) जिल्हा शल्य चिकीत्सक,गडचिरोली
९) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. गडचिरोली
१०) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी ---------------------- (सर्व) जिल्हा गडचिरोली
११) सहा. आयुक्त (अन्न व औषध प्रशासन), गडचिरोली
१२) पोलीस उपविभागीय अधिकारी ---------------------- (सर्व) जिल्हा गडचिरोली
१३) तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ---------------------- (सर्व) जिल्हा गडचिरोली
१४) गट विकास अधिकारी ---------------------- (सर्व) जिल्हा गडचिरोली
१५) जिल्हा माहिती अधिकारी गडचिरोली यांनी वरीलप्रमाणे बाब विनामुल्य व्यापकस्तरावर प्रसिद्ध करावी
१६) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालिका प्रशासन गडचिरोली
१७) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, गडचिरोली
१८) मुख्याधिकारी, नगर परिषद/ पंचायती ---------------------- (सर्व) जिल्हा गडचिरोली
१९) सर्व विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख -------------- जिल्हा गडचिरोली
२०) इतर सर्व संबंधित विभाग ----------
२१) स्थळ प्रत

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

# जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@ gmail.com दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

क्रमांक.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/661 दिनांक : 25 जुन, 2021

---

वाचा :- 1. साथरोग कायदा, 1897

2.आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51

3. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973

4. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 04/06/2021.

5. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/571 दि. 04.06.2021.

6. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 25/06/2021.

(शिक्का: जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय ★ चंद्रपूर ★)

---

## : : सुधारीत आदेश : :

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2, 3, व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे व त्याबाबतची नियमावली प्रसिध्द करुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र. 04 चे आदेशान्वये, राज्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात कमी होत असल्याचे पार्श्वभुमीवर महाराष्ट्रात लागु असलेल्या टाळेबंदी आदेशातील कडक/प्रतिबंधात्मक निर्बंधास अंशत: शिथीलता देऊन संपुर्ण महाराष्ट्र राज्यात टाळेबंदी अंतर्गत निर्बंध शिथील (अनलॉक) करण्याचे दृष्टीने पाच स्तरनिहाय नियमावली दि. 07.06.2021 पासुन लागू केलेली होती. त्यानुषंगाने या कार्यालयाचे संदर्भ क्र. 05 चे आदेशान्वये, चंद्रपूर जिल्हयाचा स्तर-1 मध्ये समावेश होत असल्याने राज्य शासनाच्या संदर्भ क्र. 04 चे आदेशातील स्तर-1 मधील तरतुदी चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दि. 07.06.2021 पासुन लागु करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र. 06 चे आदेशान्वये, महाराष्ट्र राज्यातील काही जिल्हयात कोरोना विषाणूचा 'डेल्टा प्लस' हा नविन विषाणूचा प्रकार आढळुन आल्याने सदर विषाणूचा प्रादुर्भाव नियंत्रणात ठेवण्याकरीता निर्बंध अधिक कडक करण्यासंदर्भात महाराष्ट्रातील कोणताही जिल्हा स्तर -3 च्या खाली असणार नाही असे नमुद करुन संदर्भ क्र. 04 चे आदेशातील स्तर-3 च्या तरतुदी लागू करण्यास आदेशीत केलेले आहेत.



Scanned by CamScanner

त्याअर्थी, **मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर,** राज्य शासनाकडील संदर्भ 06 चे आदेशान्वये सुधारीत आदेशातील तरतुदी लागू करण्यास आदेशीत करण्यात आलेले असल्याने, संदर्भ क्र. 04 चे आदेशान्वये निर्बंध शिथील (अनलॉक) करण्याचे दृष्टीने पाच स्तरनिहाय जाहीर करण्यात आलेल्या नियमावलीतील **स्तर-3 मधील तरतुदी चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दि. 28 जुन, 2021 पासुन लागू करीत आहे.** सर्व संबंधीत प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

| अ.क्र. | Activity/क्रियाकलाप/बाबी | सुरु राहण्याचा कालावधी व प्रकार |
|---|---|---|
| 01 | अत्यावश्यक सेवेतील दुकाने/ आस्थापना | दररोज सकाळी 07.00 ते सायंकाळी 04.00 वाजेपर्यंत सुरु राहतील. |
| 02 | बिगर अत्यावश्यक सेवेतील दुकाने/ आस्थापना | सोमवार ते शुक्रवार सकाळी 07.00 ते सायंकाळी 04.00 वाजेपर्यंत सुरु राहतील. शनिवार व रविवार पुर्णपणे बंद राहतील. |
| 03 | मॉल्स / सिनेमागृहे (मल्टीप्लेक्स, सिंगल स्क्रीन) / नाटयगृहे | संपूर्णत: बंद राहतील. |
| 04 | रेस्टारंट | सोमवार ते शुक्रवार सकाळी 07.00 ते सायंकाळी 04.00 या वेळेत 50 टक्के आसन क्षमतेनुसार Dining साठी सुरु राहतील. तथापी दुपारी 04.00 ते रात्री 09.00 वाजेपर्यंत केवळ पार्सल सुविधा/Take away/घरपोच सुविधा देता येईल. तसेच शनिवार व रविवार Dining पुर्णपणे बंद राहील व केवळ पार्सल सुविधा/Take away/घरपोच सुविधा देता येईल. |
| 05 | सार्वजनिक स्थळे/ खुली मैदाने/ वॉक / सायकलींग | दररोज सकाळी 05.00 ते सकाळी 09.00 वाजेपर्यंत सुरु राहतील. |
| 06 | सर्व प्रकारची खाजगी कार्यालय | सोमवार ते शुक्रवार सायंकाळी 04.00 वाजेपर्यंत सुरु राहतील (अत्यावश्यक श्रेणी/सुटप्राप्त कार्यालये वगळता) |
| 07 | शासकीय कार्यालय उपस्थिती | 50 टक्के क्षमतेने सुरु राहतील. (कोरोना विषयक कामे करणा-या आस्थापना, कृषी, बँक, मान्सुनपूर्व कामाशी संबंधीत यंत्रणा व आपत्ती व्यवस्थापनाशी संबधीत यंत्रणा, कार्यालये पुर्ण क्षमतेने सुरु राहतील) |
| 08 | क्रिडा/खेळ | बाहेर मोकळया जागेत सकाळी 05.00 ते सकाळी 09.00 आणि सायं. 06.00 ते रात्री 09.00 या वेळेत सुरु राहतील. |
| 09 | चित्रीकरण | Bubble, सायंकाळी 05.00 वाजेनंतर बाहेर हालचालीस बंदी. |
| 10 | सामाजिक/सांस्कृतिक/मनोरंजन कार्यक्रम | सोमवार ते शुक्रवार सायंकाळी 04.00 वाजेपर्यंत सभागृहाच्या 50 टक्के आसन क्षमतेने सुरु राहतील |
| 11 | लग्न समारंभ | 50 व्यक्तींच्या उपस्थितीत पुर्व परवानगीने सुरु राहतील. (परवानगीसाठी महानगरपालीका क्षेत्राकरीता उपविभागीय अधिकारी, तालुका स्तरावर नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्राकरीता संबंधित मुख्याधिकारी व ग्रामीण क्षेत्राकरीता संबंधित तहसिलदार सक्षम अधिकारी असतील) |
| 12 | अंत्यविधी | 20 व्यक्तींच्या मर्यादेत करता येईल. |
| 13 | सभा/ निवडणुक, स्थानिक प्राधिकरण व सहकारी संस्था यांची आमसभा | सभागृहाच्या 50 टक्के आसन क्षमतेने सुरु राहतील |

Scanned by CamScanner

| अ.क्र. | स्तर/ Activity/क्रियाकलाप/बाबी | सुरु राहण्याचा कालावधी व प्रकार |
|---|---|---|
| 14 | बांधकाम | फक्त Onsite labor किंवा बाहेरुन मजुर आनण्याचे बाबतीत सायंकाळी 04.00 वाजेपर्यंत सुरु राहतील |
| 15 | शेतीविषयक कामकाज | दररोज सायंकाळी 04.00 वाजेपर्यंत सुरु राहतील |
| 16 | ई-कामर्स यांची सेवा | कोविड वर्तणुक विषयक नियमांचे पालन करुन नियमितपणे सुरु राहतील. |
| 17 | जमावबंदी / संचारबंदी | जमावबंदी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत आणि संचारबंदी सायंकाळी 05.00 नंतर लागू राहील. |
| 18 | व्यायामशाळा/सलुन/केस कर्तनालय/ब्युटीपार्लर/स्पा/वेलनेस सेंटर | दररोज सायंकाळी 04.00 वाजेपर्यंत 50 टक्के क्षमतेने सुरु राहतील, Appointment घेणे आवश्यक. A.C. च्या वापरास मनाई राहील. |
| 19 | सार्वजनिक क्षेत्रातील बस वाहतूक | पुर्ण आसन क्षमतेने सुरु राहतील परंतु प्रवासींना उभ्याने प्रवास करण्यास मनाई राहील. |
| 20 | माल वाहतूक (जास्तीत जास्त 03 व्यक्ती जसे वाहन चालक, हेल्पर, क्लीनर) यापेक्षा जास्त असतील तर प्रवासाकरीता लागू असलेले नियम लागू राहतील. | कोविड वर्तणुक विषयक नियमांचे पालन करुन नियमीतपणे पुर्ण वेळ सुरु राहतील. |
| 21 | आंतर जिल्हा प्रवासी वाहतूक (खाजगी कार,टॅक्सी, बस व ट्रेन) | नियमितपणे पुर्ण वेळ सुरु राहतील तथापी प्रवासी जर स्तर- 5 मधील भागातुन येत असेल तर ई-पास आवश्यक राहील. |
| 22 | **उत्पादन :** निर्यात प्रदान उद्योग | कोविड वर्तणुक विषयक नियमांचे पालन करुन नियमितपणे पुर्णवेळ सुरु राहतील |
| 23 | **उत्पादन क्षेत्र : 1. जिवनावश्यक वस्तुंचे उत्पादन करणारी युनिट्स** (अत्यावश्यक वस्तु व त्याकरीता लागणारे कच्चा माल उत्पादक पॅकेजींग व संपूर्ण साखळीतील सेवा).<br>2. निरंतर प्रक्रिया उद्योग<br>3.राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षणासाठी महत्वपूर्ण असलेल्या वस्तूंचे उत्पादन.<br>4. डाटा सेंटर/क्लाऊड सर्व्हिस प्रदाता/ माहिती व तंत्रज्ञान सेवा संबंधी, गुंतागुंतीचे पायाभुत सेवा व उद्योग. | कोविड वर्तणुक विषयक नियमांचे पालन करुन नियमितपणे पुर्ण वेळ सुरु राहतील |
| 24 | उत्पादन क्षेत्रातील (अत्यावश्यक सेवा व निरंतर प्रक्रिया उद्योग, निर्यात प्रदान उद्योग व वरिल मुद्दा क्र. 22 व 23 मधील बाबी वगळून इतर उत्पादन क्षेत्रातील उद्योग व सेवा) | 50 टक्के स्टॉफचे हालचालीचे परवानगीसह सुरु राहतील. |

वरील Activity/क्रियाकलाप/बाबी याकरीता खालील कोरोना विषयक वर्तणुकीचे पालन करणे बंधनकारक राहील.

1. संपूर्ण चंद्रपूर जिल्हयातील मनपा, शहरी व ग्रामीण भागामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144 अंतर्गत सकाळी 05.00 ते संध्याकाळी 05.00 या कालावधीत जमावबंदी लागू राहील. तसेच संध्याकाळी 05.00 ते सकाळी 05.00 या कालावधीत संचारबंदी लागू राहील. सदर कालावधीमध्ये कोणत्याही व्यक्तीस मुक्त संचार करण्यास मनाई असेल.

Scanned by CamScanner

2. उपरोक्त Activity/क्रियाकलाप/बाबी च्या ठिकाणी नियमितपणे मास्कचा वापर करण्यात यावा.
3. सदर ठिकाणी प्रवेशव्दाराजवळ ग्राहकांकरीता/ प्रवेश करणा-यांना हात धुण्याकरीता साबण किंवा हॅण्ड सॅनिटायजर ठेवणे आवश्यक राहील.
4. सदर ठिकाणी येणा-या प्रत्येक व्यक्तीमध्ये सामाजिक अंतर पाळले जाणे आवश्यक राहील. शक्यतोवर गर्दी टाळावी.
5. सदर ठिकाणी येणा-या प्रत्येक ग्राहकांकरीता एकमेकांत सामाजिक अंतर पाळले जाण्याचे दृष्टीने सामाजिक अंतरावर वर्तुळे तयार करणे यासारख्या बाबी कराव्यात.

सदर नियमांचे उल्लंघन केल्यास कोरोना महामारीची आपत्ती जोपर्यंत अस्तित्वात आहे तोपर्यंत संबंधीत दुकान/आस्थापना बंद ठेवण्यात येईल. तसेच सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास/केल्यास संबंधित सभागृह/मंगल कार्यालय/लॉन/जागा यांचे मालक/व्यवस्थापक, हॉटेल/रेस्टांरंट व तत्सम आस्थापना यांचे व्यवस्थापक/मालक/ दुकानदार/व्यापारी/संस्था चालक यांचेवर पहिल्या चुकीसाठी/उल्लंघनासाठी पहिला दंड रु. 5,000/-, दुसरा दंड रु. 10,000/- व तिसरा दंड रु. 20,000/- याप्रमाणे तसेच कार्यक्रमाचे आयोजकांवर सुध्दा रु. 10,000/- इतका दंड तात्काळ आकारण्यात येईल व इतरही नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. तसेच विना मास्क आढळलेल्या व्यक्तींवर/संबंधीतांवर रु. 500/- इतका दंड आकारण्यात येईल.

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस विभाग व इतर संबंधीत विभाग यांची राहील. कोणतीही व्यक्ती, संस्था किंवा संघटना यांनी सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 तसेच साथरोग कायदा, 1897 अन्वये दंडनीय/कायदेशीर कार्यवाही संबंधीत पोलीस अधिकारी/कर्मचारी तसेच इतर संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी करावी.

**सदर आदेश संपुर्ण चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दिनांक 28.06.2021 पासुन पुढील आदेशापावेतो लागू राहील.**

**सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी दि. 25.06.2021 रोजी निर्गमीत करण्यात येत आहे.**

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण चंद्रपूर
★ चंद्रपूर

(अजय गुल्हाने)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**<u>प्रतिलीपी</u> :- <u>माहितीस सविनय सादर.</u>**

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-032
2. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई 32
3. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

**<u>माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव.</u>**

4. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
5. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
6. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर
7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
8. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
9. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
10. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
11. मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व)
12. सर्व शासकीय विभाग प्रमुख/बँक व्यवस्थापक

**<u>सदर आदेशास उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.</u>**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

D/ Rajesh Nikhare/144/BREAK THE CHAIN Order

Scanned by CamScanner